दि. 14/03/2023

लोकमत पान क्र. 3

# सेल्फी काढताना समुद्रात दोघे बुडाले

## कळंब समुद्र किनाऱ्यावर दुर्घटना

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : कळंब समुद्र किनाऱ्यावर फिरण्यासाठी गेलेल्या आणि पाण्यात सेल्फी काढत असताना दोन तरुणांचा रविवारी समुद्रात बुडाल्याने मृत्यू झाला. दोन्ही मुलांचे मृतदेह सापडले आहेत. वसई पोलिस याप्रकरणी तपास करीत आहे.



रोशन गावडे



सौरभ पाल

■ पाण्यामध्ये सेल्फी काढत असताना तोल जाऊन ते पडले असावेत, अशी माहिती वसई पोलिसांनी दिली आहे.

बिलालपाडा येथील श्रीराम नगर येथे राहणारे चार तरुण रविवारी दुपारी कळंब समुद्र किनाऱ्यावर फिरण्यासाठी गेले होते. दुपारी तीन वाजेच्या सुमारास रोशन लक्ष्मण गावडे (२३) आणि सौरभ पाल (२२) हे दोघे समुद्रात उतरले होते. बराच वेळ ते बाहेर न आल्याने त्यांच्यासोबत असलेल्या मंगेश भोये या तरुणाने आपल्या घरी याबाबत माहिती दिली. त्यानंतर या मुलांचे कुटुंबीय त्यांचा शोध घेण्यासाठी कळंब समुद्र किनाऱ्यावर आले. वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन विभागाने समुद्रात बेपत्ता झालेल्या दोघांचा शोध सुरू केला.

संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास यापैकी रोशन गावडे याचा मृतदेह वसईच्या भुईगाव समुद्र किनाऱ्यावर आढळून आला तर सौरभ पाल याचा मृतदेह सोमवारी सकाळी मिळाला. पाण्यामध्ये सेल्फी काढत असताना तोल जाऊन ते पडले असावेत, अशी माहिती वसई पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अब्दुल हक देसाई यांनी दिली. हे दोघे तरुण वसईतील खासगी कंपनीत काम करीत होते.

म.टा. पान क्र. 3

# कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपात सहभागी होणाऱ्या शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे (साविस) यांनी दिला आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने आज, मंगळवारपासून राज्यव्यापी बेमुदत संप करण्याची नोटीस दिली आहे. या संपात राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र या संघटना सहभागी आहेत. या संपामध्ये राज्य शासकीय- निमशासकीय कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ६ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शासकीय- निमशासकीय कर्मचारी यांच्या संघटनेने पुकारलेला हा संप बेकायदा ठरतो. त्यामुळे या संपात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. केंद्र शासनाचे 'काम नाही- वेतन नाही' हे धोरण राज्य शासनही अनुसरत आहे. याबाबत शासनाने याबाबत परिपत्रक जारी केले आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 14/03/2023

पुढारी पृ. पान क्र.4

# नायगाव पोलीस ठाणे लवकरच जनतेच्या सेवेत

## पेल्हार, मांडवी, आचोळे पोलीस ठाणी कार्यरत

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

पालघर जिल्हा स्थापन झाल्यावर मिरा-भाईंदर, वसई-विरार हे पोलिस आयुक्तालय स्थापन झाल्यापासून वसई-विरार महानगरातील प्रस्तावित पोलिस ठाणी तयार होऊन जनसेवेला उपयोगात येऊ लागली आहेत.

त्यामुळे वसई-विरारमध्ये लोकसंख्येच्या वाढीबरोबरच गरजेची असलेली कायदा आणि सुव्यवस्थेसाठीची पोलिस ठाणी वाढू लागल्याने पोलिस प्रशासन गतीमान होत आहे. नायगाव पोलिस ठाणे उत्तम बांधून तयार झाले असून या स्थानकाचे प्रशासकीय स्वरुप देखणे आहे. उद्घाटनासाठी हे पोलिस ठाणे तयार आहे.

अलिकडच्या काळात वसई ग्रामीण भागासाठी पाच पोलिस ठाणी मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी पेल्हार, मांडवी, आचोळे ही पोलिस ठाणी कार्यरत झाली आहेत: नायगाव पोलिस ठाणे उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. या पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रमेश भामे व सहा.पो.निरिक्षक बलराम पालकर यांनी पोलिस कार्यालये उभारण्यासाठी मेहनत घेतली आहे.

अजून बोळींज येथील पोलिस ठाणे जागेअभावी निश्चित व्हायचे असून पुढील वर्षापर्यंत हे पोलिस ठाणे मार्गी लागल्यास विरार, बोळींज, आगाशी पश्चिमेकडील भागाला असणारी पोलिस ठाण्याची उणीव दूर होणार आहे.

अर्नाळा समुद्र किनाऱ्यालगत असणारे सागरी पोलिस ठाणे शहरापासून दूर असल्याने विरार पश्चिमेकडील शहरी व ग्रामीण भागाला खऱ्या पोलिस ठाण्याची उणीव भासत आहे.

पुण्यनगरी पृ. पान क्र.4

# क्रिकेट स्पर्धेत पालिका संघ विजयी



**मीरा रोड.** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून शनिवारी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेत मीरा-भाईंदर महापालिका संघाने गुन्हे अन्वेषण विभागाच्या संघाला हरवून विजेतेपद पटकावले आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने क्रिकेट सामन्यांचे आयोजन केले होते. या क्रिकेट स्पर्धेत पाच पटकांचे सामने होते. तर ठपठपांत्य व उपांत्य सामने सहा पटकांचे होते.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामधील पोलीस अधिकारी, कर्मचारी व महापालिका अधिकारी, कर्मचारी यांचे क्रिकेट संघ यामध्ये मीरा-भाईंदर महापालिका संघ वसई-विरार महापालिका संघ व मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांचे सहा संघ तसेच महिला दिनानिमित्त महिलांचे दोन संघ असे सामने खेळवले होते. यामध्ये मीरा-भाईंदर महापालिकेच्या संघाने प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. अंतिम सामना गुन्हे अन्वेषण विभागाच्या संघाविरुद्ध होता. या सामन्यात गुन्हे अन्वेषण विभागाच्या संघाने नाणेफेक जिंकून महापालिका संघाला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. महापालिका संघाचे अलंकार भोईर, उमेश वाघ व मिथुन यांनी उत्कृष्ट फलंदाजी करून संघाचा धावफलक ६२ धावांवर नेला. गुन्हे अन्वेषण संघाला विजयासाठी ६३ धावांची गरज असताना महापालिका संघाचे गोलंदाज चेतन राऊत व विशाल माची यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे गुन्हे अन्वेषण संघाला ३९ धावांनी पराभूत करून महापालिका संघाने क्रिकेट स्पर्धा जिंकली.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

दि. 14/03/2023

# मीरा-भाईंदरवासीयांना ना करवाढ, ना दरवाढीचा त्रास

## महापालिकेचे दोन हजार १७४ कोटींचे प्रशासकीय अंदाजपत्रक आयुक्तांनी केले सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** मीरा-भाईंदर महापालिकेचे २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कोणतीही करवाढ आणि दरवाढ नसलेले दोन हजार १७४ कोटी ५४ लाखांचे अंदाजपत्रक प्रशासक तथा आयुक्त दिलीप ढोले यांनी सोमवारी सादर केले. यावेळी आयुक्तांनी शहरातल्या ४५ रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पालिका शाळांचे सर्व वर्ग डिजिटल करणे, पालिकेचे डाटा सेंटर उभारून अभिलेखाचे डिजिटायझेशन, ५७ ई बस खरेदी, आदी अनेक विकासकामे करण्यावर भर दिला.

गेल्यावर्षी प्रशासनाकडून १ हजार ८१८ कोटींचे अंदाजपत्रक सादर केले गेले होते. त्यामध्ये तत्कालीन स्थायी समिती व महासभेने वाढ करून ते २ हजार २५१ कोटींचे मंजूर केले होते. २००२ साली महापालिकेची पहिली निवडणूक झाल्यापासून आतापर्यंतच्या २१ वर्षांच्या कालावधीतील यंदाचे हे पहिलेच प्रशासकीय अंदाजपत्रक आहे.

२५ लाख शिलकीचे २ हजार १७४ कोटी ५४ लाखांचे अंदाजपत्रक आयुक्त दिलीप ढोले यांच्यासह अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे व अनिकेत मानोरकर, उपायुक्त मारुती गायकवाड, संजय शिंदे, कल्पिता पिंपळे व रवी पवार, शहर अभियंता दीपक खांबित, अतिरिक्त शहर अभियंता सुरेश वाकोडे, सचिव वासुदेव शिरवळकर, मुख्य लेखाधिकारी कालिदास जाधव, लेखाधिकारी अजित कुलकर्णी, मुख्य लेखापरीक्षक मंजिरी डिमेलो, आदींनी सादर केले.

४५ प्रमुख रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी १०४ कोटी ४७ लाख, अमृत २ अभियानांतर्गत ५१६ कोटी ७८ लाखांच्या प्रकल्पास, तर १७५ कोटी १९ लाखांच्या मलनिस्सारण योजनेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी ५६ कोटी २२ लाखांची, तर स्वच्छ भारत अभियानासाठी चार कोटींची तरतूद केली असल्याचे आयुक्त ढोले यांनी सांगितले.

### डिजिटल वर्गाद्वारे पालिका शाळांचा स्तर उंचावणार

शहरातील उद्याने सुशोभित करण्यासाठी ५७ कोटी ६३ लाखांची, तर शहर सुशोभित करण्यासाठी १० कोटींची तरतूद आहे. महापालिका शाळांचा दर्जा व स्तर उंचावण्यासाठी सर्व शाळांचे वर्ग डिजिटल केले जाणार आहेत. त्यासाठी १ कोटी, आधुनिक प्रयोगशाळांसाठी ५० लाख, दिव्यांग मुला-मुलींच्या फिजिओथेरपी, इतर वैद्यकीय सोयी-सुविधा व योजनांसाठी ५ कोटी २५ लाख, महिला व बालकल्याणसाठी ६ कोटी ५८ लाख, तर क्रीडा विभागासाठी ६ कोटी १२ लाखांची तरतूद अंदाजपत्रकात प्रशासनाने केली आहे.

पर्यावरण संरक्षण, संवर्धनासह हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध कामे राज्य शासनाच्या धर्तीवर ज्येष्ठ नागरिकांच्या मोफत वैद्यकीय तपासणीसाठी ५० लाख ठेवण्यात आले आहेत. उत्तन डम्पिंग येथील साचलेल्या कचऱ्यावर बायो मायनिंगसाठी २२ कोटी, तर लहान बायोगॅस प्रकल्प उभारणीसाठी १० कोटींची तरतूद आहे.

सरकारच्या निर्देशानुसार पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी महापालिकेला १५ व्या वित्त आयोगामार्फत स्वच्छ हवा कृती आराखड्यासाठी ४२ कोटी ७५ लाखांचा निधी मिळाला असून, हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी दोन वाहनांवरचे डस्ट कंट्रोल मशीन, तीन यांत्रिक सफाई यंत्र, नवीन हरीतपट्टे व कारंजे, ई-बसेस, चार्जिंग स्टेशन, आदी कामे केली जात आहेत, असे महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी सांगितले.

### रुपया असा येणार



उत्पन्न पाहता शासन अनुदान २९१ कोटी ४३ लाख, कर्ज द्वारे ४३३ कोटी, जीएसटी अनुदान २८० कोटी, मालमत्ता कर १२३ कोटी ४२ लाख, १ टक्का मुद्रांक शुल्क नुसार ५५ कोटी, इमारत विकास आकार २०० कोटी, रस्ता नुकसान भरपाई ११० कोटी, मोकळ्या जागेवरील कर ५० कोटी, जाहिरात, होर्डिंग्ज व पे अँड पार्कमधून १४ कोटी, पाणी पुरवठा जलनिस्सारण व मलनि:स्सारणमधून ४११.६४ कोटी, बाजार फी ८ कोटी, घनकचरा शुल्कद्वारे २५ कोटी, अनधिकृत बांधकाम शास्ती ४ कोटी ७५ लाख, विशेष शिक्षण कर ८ कोटी, भांडवली जमा २७ कोटी ४६ लाख, वृक्षकर ४ कोटी १७ लाख, संकीर्ण २० कोटी ८० लाख, परवाना फी पाच कोटी जमेच्या स्वरुपात गृहीत धरण्यात आले आहेत.

पुढारी पू. पान क्र. 4

# प्रलंबित मागण्यांसाठी वसईकर एकवटले

## ६९ गावांचा पाणीप्रश्न सोडवा, सोयीसुविधा पुरवा; पालिकेला दिले निवेदन

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई -विरार मधील नागरिकांना, तसेच लगतच्या ६९ गावाना पिण्याचे पाणी मिळावे, अनधिकृत नळजोडणी अधिकृत करण्याचा आदेश मागे घ्यावा, निरी आयआयटी अहवालाची अंमलबजावणी सोबतच महानगर पालिकेच्या शाळा नसणे, आरोग्य केंद्र, उपकेंद्र, २०० खाटांचे सुसज्य दवाखाने, उत्तम परिवहन सेवा, सुलभ शौचालय, ट्रॅफिक समस्यांवर तोडगा काढणे, कचरा व्यवस्थापन आदी प्रश्नावर महानगर पालिका मुख्य कार्यालयवर जोरदार धरणे आंदोलन आज करण्यात आले. वसई विरार शहरातील मूलभूत प्रश्नावर आज निघालेल्या विविध संघटनांच्या या धरणे मोर्च्याला शेकडो नागरिकांनी उस्फुर्त उपस्थित राहून मोठा प्रतिसाद दिला.



पर्यावरणवादी कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. मोर्चाच्या शिष्टमंडळा सोबत चर्चा करताना ६९ गावातील नागरिकांना सोबत शहरात ज्यांना बांधकाम पूर्ण झाल्यावर ओसी मिळाली आहे. त्यांना मागील ५-१० वर्षापासून पाणी मिळत नाही. त्यांना तत्काळ पाणी उपलब्ध करून देण्यात यावे तसेच अनधिकृत नळजोडणी अधिकृत करण्याची परंपरा सुरू करून आपल्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या वसई पलिकने सदर आदेश मागे न घेतल्यास तीव्र आंदोलन करताना मुंबई उच्च न्यायालयात या आदेशाला आव्हान दिले जाईल असे स्पष्ट भूमिका घेण्यात आली.

निरी आयआयटी अहवाची अंमलबजावणी, आरोग्य, शिक्षण, परिवहन बाबत सकारात्मक चर्चा झाली. येत्या काही दिवसात याबाबतचा कृती आराखडा नागरिकांसमोर मांडण्यात येईल तसेच २०२१ ते २०४१ विकास आराखडामध्ये शाळा, आरोग्य केंद्र, मैदाने, बगीचा आदीबाबत योग्य पावले उचलली जातील असे आश्वासन यावेळी उप आयुक्त अजिंक्य बागाडे यांनी दीले. यावेळी उप आयुक्त गवस, पाणी पुरवठा विभागाचे नरसाळे, परिवहन, शिक्षण, आरोग्य, घनकचरा विभागाचे अधिकारी उपस्थिती होते. वसई विरार परिसरातील सामान्य जनतेने काढलेल्या मोर्चाला श्याम पाटकर, जन आंदोलनच्या नेत्या डॉमनिका डाबरे, पर्यावरण संवर्धनचे समीर वर्तक, कामगार संघटनेचे राजू भिसे, युवा भारतचे शशी सोनवणे, श्रमजीवी संघटनेचे गणेश उंबरसडा, जुरान लोपीस आदी २० पेक्षा जास्त संस्था, संघटना, पक्ष यांनी सहभाग घेत आपला जाहीर पाठिंबा दिला.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 14/03/2023

लोकसत्ता पू. पान क्र. 1

# शालेय विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक

## जनआक्रोशानंतर वाहनांची तपासणी सुरू

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** वसई, विरार शहरात शालेय विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक सुरू असल्याचे 'लोकसत्ता'ने उघड केल्यानंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे पोलीस उपायुक्तांनी कडक कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानंतर वाहनांची तपासणी सुरू करण्यात आली आहे.

शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने आण करण्यासाठी बस गाड्या, व्हॅनचा वापर केला जातो. मुलांची सुरक्षितरीत्या ने-आण होणे आवश्यक आहे. मात्र वसई विरार शहरात अनेक ठिकाणी शाळेला लावण्यात आलेल्या बसेस नियमांचे व शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या सूचनांचे पालन करीत नसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे अपघात घडण्याची शक्यता आहे. याबाबचे वृत्त लोकसत्ताने प्रसिध्द करताच नागरिकांनी संताप व्यक्त केला आणि कारवाईची मागणी केली. परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी अशा स्कूल व्हॅनला परवानगी नसल्याचे स्पष्ट केले. तसेच अशा वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सोमवारी वाहनांची तपासणी सुरू होती. परंतु पोलीस कारवाईच्या भीतीने अनेक वाहने गायब झालेली दिसली.

### जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची

शाळा बस आणि वाहनांच्या दुर्घटना घडू नये यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमुळे शालेय विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या बस व इतर गाड्या यांचे वैध विमा प्रमाणपत्र, वैध वाहन योग्यता प्रमाणपत्र, चालक- मदतनीस, आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचे मार्ग, मुलांची सुरक्षितता यावर विशेष लक्ष देता येणार आहे. समिती प्रत्येक शालेय स्तरावर तयार करण्याच्या सूचना होत्या. मात्र अनेक शाळा याकडे दुर्लक्ष करीत आहेत. नुकताच याबाबत पोलीस आयुक्तालयात परिवहन समितीची बैठक पार पडली. यात शहरातील विद्यार्थ्यांची वाहतूक व्यवस्था, चालक चारित्र्य पडताळणी, पार्किंग यावर चर्चा झाली. एखादी दुर्घटना घडल्यास शाळा व्यवस्थापनालाच जबाबदार धरावे, अशा सूचना या बैठकीत पोलीस आयुक्तांनी यावेळी केल्या आहेत.



### १७८ वाहनांची तपासणी

वसई ७ स्कूल व्हॅन व ९७१ शालेय बसेसची नोंद आहे. वाहतूक विभागाने शालेय बसेसच्या तपासणीची मोहीम सुरू केली आहे. आतापर्यंत १७८ बसेसची तपासणी केली आहे. त्यात २९ वाहने दोषी आढळून आली आहेत. त्यांच्याकडून १ लाख ४४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितली आहे.

लोकमत पान क्र.3

# टँकरचा मडगार्ड लागून मृत्यू

**नालासोपारा :** रस्त्यावरून पायी चालत जाणाऱ्या ११ वर्षांच्या अल्पवयीन मुलाचा टँकरचा मडगार्ड लागून रविवारी दुपारी दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. राजनगर ते नालेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर भरधाव वेगातील टँकरच्या पाठीमागील बाजूला असलेला लोखंडी मडगार्ड पायी चालणाऱ्या पवन ब्रह्मदेव सिंग (वय ११) याच्या डोक्याला लागून तो गंभीर जखमी झाला होता. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने तो मरण पावला.

पुढारी पू. पान क्र. 2

# 'त्या' महिलेचा मृत्यू

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील प्रगतीनगर परिसरात ६ मार्च रोजी सायंकाळी एका व्यक्तीने पत्नीच्या अंगावर पेट्रोल ओतून तिला पेटवून दिले होते. यात गंभीररित्या होरपळलेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

अनिशा पांचाळ ( ३७) या पती संतोष पांचाळ आणि तीन मुलींसोबत राहत होत्या. नवरा रिक्षा चालवतो. ६ मार्च रोजी होळीचा सण सगळीकडे साजरा केला जात असताना सायंकाळी ७ च्या सुमारास अनिशा घरी असताना तिचा पती संतोष घरी पोहोचला आणि कशावरून तरी भांडण करू लागला. त्याने पत्नीला घराबाहेर काढण्यास सुरुवात केली, मात्र पत्नीने विरोध केल्यावर त्याने बाटलीत ठेवलेले पेट्रोल तिच्या अंगावर ओतून तिला पेटवून दिले. जळालेल्या पत्नीला तो स्वतः जेजे रुग्णालयात घेऊन गेला. ७० टक्के जळालेल्या महिलेचा उपचारादरम्यान जे जे रुग्णालयात मृत्यू झाला.

CS CamScanner
Scanned with CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र. ३

दि. 14/03/2023

# पोलीस कोठडीतील आरोपींना धास्ती

## विक्षिप्त आरोपीमुळे हल्ल्याची भीती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरार पोलिसांच्या कोठडीत असलेल्या सात आरोपींची रात्रीची झोप उडाली होती. कारण होते त्यांच्या कोठडीत असलेला एक विक्षिप्त आरोपी. आईची हत्या करणारा देवांश धनू याला पोलीस कोठडीत ठेवल्याने तो आपल्यावरही हल्ला करेल, या भीतीने इतर कैदी धास्तावले होते.

विरारच्या गांधीनगर परिसरातील वक्रतुंड अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या वैशाली धनू (४४) यांची तिचाच मुलगा देवांश याने हत्या केली होती. देवांश याला पब्जी खेळाचे व्यसन होते. त्याच्या आईने मोबाइलवर हा खेळ खेळण्यास विरोध केल्याने त्याने आईची हत्या केली होती. त्याला विरार पोलिसांनी अटक करून पोलीस कोठडीत ठेवले होते.

देवांश ज्या कोठडीत होता तेथे अन्य सात आरोपी होते. मात्र, देवांश याचा विक्षिप्तपणा पाहून इतर आरोपी घाबरले. कोठडीत असताना देवांश गाणी म्हणत होता, हातात मोबाइल नसतानाही पब्जी खेळ खेळत होता. त्याने विक्षिप्तपणामुळे इतर आरोपी घाबरले होते. त्यामुळे रात्रभर कुणीही झोपले नाही.

देवांश पब्जी खेळाच्या व्यसनामुळे विक्षिप्त बनला होता. त्याचे मानसिक संतुलनही बिघडले होते. परंतु, न्यायालयाच्या आदेशाशिवाय अशा आरोपींना वेगळे ठेवता येत नसल्याने त्याला इतर आरोपींवरोबर ठेवावे लागले, अशी माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली. देवांश याची पोलीस कोठडी संपल्याने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. तो गेल्याने इतर आरोपींनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# नालासोपाऱ्यात चोरी; नोकर जेरबंद

## साडेचार लाख रुपयांचे दागिने हस्तगत

**लोकसत्ता वार्ताहर**

गुन्हे वृत्त

**वसई :** नालासोपारा पूर्वेतील मोरेगाव येथे नोकरानेच मालकाच्या घरी लाखो रुपयांची चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या आरोपीला तुळिंज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. आरोपीकडून चार लाख ५८ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

वसई-विरार शहरात घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यातच नालासोपारा पूर्वेतील मोरेगाव खंडीचा पाडा परिसरात एका घरात चोरी झाली होती. याप्रकरणी तुळिंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने त्याचा तपास सुरू केला होता.

या वेळी घरात पाच ते सहा वर्षे कामासाठी असलेल्या उत्तम ज्ञानेश्वर खंदारे या नोकराची पोलिसांनी चौकशी केली. या वेळी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना तो दिशाभूल करीत असल्याचा संशय पोलिसांना आला होता. तसेच चौकशीचा ससेमिरा टाळण्यासाठी त्याने फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न करत तपास प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला होता.

अखेर चौकशीअंती खंदारे याने एका विधिसंघर्ष बालकाच्या संगनमताने चोरी केल्याचे उघड झाले. त्यामुळे त्याला अटक केल्याची माहिती तुळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली आहे.

# पुलावरून उडी; महिलेवर शस्त्रक्रिया

**भाईंदर :** पतीसोबत झालेल्या घरगुती वादातून भाईंदरच्या उड्डाणपुलावरून एका महिलेने बाळासह उडी मारली होती. या घटनेतील महिलेवर शस्त्रक्रिया करण्यात आली असून, तिच्यासह बाळाची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले.

मागील आठवड्यात गुरुवारी निकिता जैस्वाल (वय २१) हिने आपल्या दोन वर्षांच्या बाळाला घेऊन भाईंदर उड्डाणपुलावरून उडी मारल्याची घटना घडली होती. यावेळी वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे अवघ्या काही मिनिटांत या दोघांना उपचारासाठी पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेत दोघे बचावले असले तरी बाळाला आणि आईला दुखापत झाली होती. आईची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले होते. या महिलेवर रविवारी यशस्वीरित्या शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या तिची प्रकृती स्थिर आहे.

प्राथमिक तपासात पतीसोबत झालेल्या वादामुळे महिलेने आत्महत्येचे पाऊल उचलले असल्याचे समोर आले आहे. सध्या महिलेवर उपचार सुरू असल्यामुळे तिला जेव्हा शक्य असेल, तेव्हा तिचा जबाब घेतला जाणार आहे, अशी माहिती भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुगुटराव पाटील यांनी दिली.


CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पान क्र. १

दि. १४/०३/२०२३

# चर्चा निष्फळ; संप अटळ

## अधिकारी तूर्त दूरच, जुन्या पेन्शनवर समिती नेमण्याचा प्रस्ताव फेटाळला



### नियोजन केल्यास शक्य

जुनी पेन्शन योजना लागू केल्याने सरकारच्या तिजोरीवर आर्थिक भार तूर्त पडणार नाही. काही वर्षांनंतर नियोजन करून सरकारला योग्य व्यवस्थापन करता येऊ शकेल; पण सरकारने कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पानेच पुसण्याचे ठरविलेले दिसते, असे विश्वास काटकर म्हणाले.

बैठकीला विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार, विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मध्य. कर्म. संघटना, चतुर्थश्रेणी कर्म. महासंघ, शिक्षक भारती, जि. प. कर्म. महासंघ, जि. प. युनियन, विद्यापीठ शिक्षकेतर संघटना, माध्य. विद्यालय शिक्षकेतर संघटना, जुनी पेन्शन संघटना, महाविद्यालयीन प्राध्यापक संघटना, प्राथमिक शिक्षक संघटना यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलाविलेल्या बैठकीत तोडगा न निघाल्याने राज्य सरकारी कर्मचारी १४ मार्चपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. मात्र अ आणि ब अधिकाऱ्यांच्या संघटनेने तूर्त संपात न उतरण्याची भूमिका घेतली आहे.

जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसंदर्भात अभ्यास करण्यासाठी राज्य सरकार प्रशासकीय अधिकाऱ्यांची एक समिती नियुक्त करेल आणि त्या समितीच्या शिफारशींच्या आधारे निर्णय घेऊ, असे आश्वासन शिंदे-फडणवीस यांनी सुकाणू समितीच्या नेत्यांबरोबर विधानभवनात झालेल्या बैठकीत दिले आणि संपावर न जाण्याचे आवाहन केले. मात्र, सुकाणू समितीने हा प्रस्ताव फेटाळला. सरकारला जुनी पेन्शन द्यायची असेल तर आजच तसा निर्णय जाहीर करायला हवा होता, पण सरकार वेळकाढूपणा करीत असल्याने आम्हाला संपाशिवाय पर्याय नाही, असे सरकारी-निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी जाहीर केले.




### संपात सहभागी झाल्यास शिस्तभंगाची कारवाई

■ संप रोखण्यासाठी राज्य सरकारकडून अत्यावश्यक सेवा परिरक्षण कायदा (मेस्मा) लागू केला जाण्याची शक्यता आहे. संपात सहभागी झाल्यास ती गैरवर्तणूक समजली जाईल आणि अशा कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने सोमवारी काढले. संपावर गेलेल्या कर्मचाऱ्यांना काम नाही तर वेतन नाही या तत्त्वानुसार संपकाळात पगारही दिला जाणार नाही.

■ विभाग प्रमुखांनी संपकाळात त्यांचे कार्यालय सोडून जाऊ नये, विभागप्रमुख, कार्यालय प्रमुखांनी संप संपेपर्यंत कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये आणि रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रत्येक कर्मचारीनिहाय विचार करून रजा रद्द करून त्यांना तत्काळ कामावर बोलवावे. संपात सहभागी झाल्यास कर्मचाऱ्यांच्या सेवेमध्ये खंड पडू शकतो, असा इशाराही सरकारने दिला आहे.

### २८ मार्चपासून अधिकारीदेखील संपात उतरणार

राजपत्रित अधिकारी महासंघाने सोमवारी एक पत्र मुख्य सचिवांना दिले आणि जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी २८ मार्चपासून आंदोलनात उतरणार असल्याचे जाहीर केले.

ज्या राज्यांनी ही जुनी निवृत्ती योजना लागू केली आहे, त्याबाबत त्यांचा रोडमॅप अद्यापही तयार नाही. या योजनेबाबत राज्य सरकार जे धोरण स्वीकारेल, त्यात याआधी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. आम्ही अडेल भूमिका घेणार नाही आणि कर्मचाऱ्यांनीही घेऊ नये.

\- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

आमच्या संपामुळे सरकारी कार्यालये, शासकीय रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदांचे कामकाज ठप्प होईल.

\- विश्वास काटकर, कर्मचारी नेते

म.टा.पु. पान क्र. १

# गुढीपाडव्याच्या शोभायात्रेत रामायणातील देखावे

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसई तालुक्यातील सर्वात मोठी आणि लक्षवेधी अशी नालासोपाऱ्याची नववर्ष स्वागतयात्रा यंदाही मोठ्या उत्साहात निघणार आहे. गुढीपाडव्यानिमित्त निघणाऱ्या या शोभायात्रेत यावर्षी रामायणावर आधारित देखावे सादर करण्यात येणार आहेत. शोभायात्रेच्या तयारीला आता वेग आला आहे.

नालासोपाऱ्यात बहुजन विकास आघाडीतर्फे गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा काढण्यात येते. या नववर्ष शोभायात्रेतून वेगवेगळे संदेश देण्यात येतात. आजवर सर्वधर्मसमभाव, निवृत्त सैनिक आणि हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबांचा सन्मान, पर्यावरणरक्षण आदी विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली आहे. यावेळी शूर्पिक गुढीपाडव्यासाठी रामायणाची संकल्पना निवडण्यात आली आहे. रामायणातील काही प्रसंग मंडळांतर्फे चित्ररूपाने, नाट्यरूपाने शोभायात्रेत सादर करण्यात येणार आहेत. ही शोभायात्रा आचोळे तलाव, सेंट्रल पार्क आणि नालासोपारा पश्चिम येथून संध्याकाळी ४ वाजता सुरू होणार असून, राधानगर येथे शोभायात्रेची सांगता होणार आहे. बहुजन विकास आघाडीचे आमदार हितेंद्र ठाकूर, आमदार क्षितिज ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील, माजी महापौर रुपेश जाधव, माजी उपमहापौर उमेश नाईक, माजी सभापती पंकज ठाकूर आणि हेमंत म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली ही शोभायात्रा निघणार आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 14/03/2023

लोकमत पान क्र. 6

# किल्ल्यांवर दारूबंदी; कारावास अन् दंड!

## सुधीर मुनगंटीवार यांची माहिती, हेरिटेज मार्शल नेमणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गडकिल्ल्यांवर दारू पिणाऱ्यांना तीन महिने कारावास आणि दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा प्रस्तावित असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी विधानसभेत सांगितले.

काँग्रेसचे संग्राम थोपटे यांनी गडकिल्ल्यांच्या परिस्थितीबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मुनगंटीवार यांनी सांगितले की, जिथे वीररसाचा इतिहास रचला गेला अशा गडकिल्ल्यांवर सोमरसाचे प्राशन करण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. दारू पिणाऱ्यांना पकडण्यासाठी हेरिटेज मार्शल नेमण्यात येतील. जे स्वयंसेवक असे प्रकार उघडकीस आणतील त्यांना दंडाच्या पन्नास टक्के रक्कम बक्षीस म्हणून देण्याचेही प्रस्तावित आहे. राज्याच्या विधि व न्याय विभागाच्या मंजुरीसाठी हा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. रायगड किल्ला केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो. तो किमान पाच वर्षांसाठी तरी राज्य सरकारच्या ताब्यात द्यावा, अशी विनंती केंद्राला केल्याचेही ते म्हणाले.

भीमराव तापकीर यांनी सिंहगड किल्ल्याच्या पुणे आणि कल्याण दरवाजाचा भाग खचत चालल्याचे म्हटले होते, त्यावर सिंहगड आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही मुनगंटीवार म्हणाले.



### संरक्षित स्मारकांना ५१३ कोटींचा निधी

१ राज्यात ३८७ संरक्षित स्मारके आहेत. मागील सरकारच्या काळात या स्मारकांच्या देखभालीकडे दुर्लक्षच झाले होते. आता मात्र जिल्हा नियोजनापैकी सुमारे ५१३ कोटींचा निधी देण्यात येणार आहे.

२ ७५ स्मारकांच्या ठिकाणी जनसुविधा निर्माण करण्याचे कार्यही हाती घेण्यात आले असून, त्यासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. शौचालये बांधण्यासाठी सुलभ इंटरनॅशनलला तीस वर्षांचे कंत्राट देण्यात येणार आहे.

३ सर्व ३८७ स्मारकांवर त्यांची माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. किल्ल्यांवरील अतिक्रमणेही दूर करण्यात येत आहेत, असे मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

Scanned with CamScanner

लोकमत

# पैशांचा पाऊस नव्हे, कोठडीची हवा खाल!

## भोंदू मांत्रिकाच्या नादी लागून नुकसान करू नका

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मनातील सुप्त इच्छा पूर्ण होण्यासाठी अनेक जण कोणत्याही थराला जातात. विशेषतः मांत्रिक, भानामती, जादूटोणाद्वारे भोंदूगिरीच्या आहारी जातात. राज्यात अंधश्रद्धा व जादूटोणाविरोधी कायदा होऊनही दिवसेंदिवस भोंदूगिरीचा भूलभुलैया वाढत चालला आहे. त्यात अशिक्षितांपासून ते सुशिक्षितांपर्यंत मोहजालात गुरफटल्याचे दिसून आले आहे. कधी पैशांचा पाऊस तर कधी पुत्रप्राप्ती, भूत-प्रेत घालविण्यासाठी नागरिक भोंदू मांत्रिकाच्या नादी लागून नुकसान करून घेत आहेत.

भोंदू मांत्रिकाकडून महिलांवर अत्याचार करणे, चमत्कार दाखविण्याच्या क्षमतेचा दावा करून लोकांची फसवणुकीचे अनेक प्रकार घडले आहेत. मात्र, त्यानंतरही अलौकिक शक्ती प्राप्त करण्यासाठी आयुष्य धोक्यात घालण्यास अनेकांकडून प्राधान्य दिले जात आहे. संपत्ती, पैसा मिळविण्यासाठी अमानुष कृत्यासह मानवी बळी देण्याचाही प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे.



### काय आहे अंधश्रद्धा निर्मूलन कायदा?

महाराष्ट्र नरबळी व इतर अमानवी, अघोरी प्रथा, जादूटोणा निवारण व उच्चाटन कायदा २०१३ जो सामान्यत: अंधश्रद्धा निर्मूलन कायदा म्हणून ओळखला जातो. तो राज्यात २६ ऑगस्टपासून अमलात आला. या कायद्यान्वये गुन्हे दाखल करतात.

### काय होऊ शकते शिक्षा?

या प्रस्तावित कायद्यात नरबळी, जादूटोणा व चमत्काराच्या नावाखाली अघोरी कृत्ये करणाऱ्यांना सहा महिने ते ७ वर्षांच्या तुरुंगवासाची, तसेच ५ ते ५० हजार रुपयांपर्यंतच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद असणार आहे.

### वर्षभरात दोन प्रकरणे उघड

२०२२ या वर्षात लोकांची फसवणूक आणि जादूटोणा करून अंधश्रद्धा पसरवणाऱ्या आरोपींविरोधात तुळींज आणि विरार पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल केले आहेत.

### भोंदूबाबांपासून सावधान

**घटना १**

नालासोपाऱ्याच्या मलायका शोरूमच्या वर २५ ऑगस्ट २०१९ ते २ जानेवारीपर्यंत समाजात अंधविश्वास पसरवून गरीब लोकांची फसवणूक, जादूटोणा करून अंधश्रद्धा वाढवीत असल्यामुळे आरोपी येशूचा प्रचारक याच्याविरुद्ध राजेश पाल (२५) याने २ जानेवारी रोजी तक्रार देऊन जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता.

**घटना २**

गास कोपरी येथील व्यावसायिक चंददीप स्वामी यांची २०१४ ते ११ ऑगस्ट २०२१ दरम्यान फसवणूक केली. आरोपी भोंदू बाबा मोहम्मद समीर खान ऊर्फ समीर कादरी (४१) याने चंददीप स्वामी आणि त्यांची मुलगी यांना अमानुष व अघोरी प्रथा, जादूटोणा अशा स्वरूपाची कृती करून वेळोवेळी ४८ लाख रुपये घेऊन ते पैसे परत केले नाहीत.

### जगात चमत्कार घडत नाही

कोणत्याही चमत्कारावर विश्वास ठेवू नका. चमत्कार या जगात कोणत्याही प्रकारे घडत नाही. प्रत्येक चमत्कारामागे वैज्ञानिक कारण किंवा हातचलाखी असते. स्वतःचे आयुष्य कर्माच्या हाती असते त्यामुळे नशिबाच्या हाती देऊन चालत नाही. कर्मावर विश्वास ठेवा, बाबाबुवांवर विश्वास ठेवू नका.

- सचिन थिटे,
राज्य सहकार्यवाह, महाराष्ट्र अंनिस



Scanned with CamScanner

लोकमत

# चारित्र्याचा संशय, पतीने केली पत्नीची गळा आवळून हत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : चारित्र्याच्या संशयावरून संतोष भवनच्या वालईपाडा येथे पतीने पत्नीची टॉवेलच्या साहाय्याने गळा आवळून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळाल्यावर पेल्हार पोलिसांची टीम घटनास्थळी जाऊन पंचनामा करत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. पेल्हार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

वालईपाडा येथील नरेंद्र नगरच्या साई सिद्धी चाळीत राहणाऱ्या अनिता विश्वकर्मा (वय २५) हिची हत्या आरोपी पती प्रभुनाथ विश्वकर्मा (२६) याने केली आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पतीने चारित्र्याच्या संशयावरून रविवारी रात्री ३ वाजण्याच्या सुमारास पत्नी झोपेत असताना टॉवेलच्या साहाय्याने गळा आवळून हत्या केली. आरोपीने दोन्ही लहान मुलांना वहिणीच्या घरी सोडले व रात्रभर विचार करत तो मृतदेहाजवळ झोपला. सोमवारी सकाळी सात वाजता उठून आरोपी कामावर गेला, पण त्याचे मन लागत नसल्याने पेल्हार पोलिस ठाण्यात दुपारी जाऊन घडलेली हकिकत पोलिसांना सांगितली.

घटनेप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी पतीला अटक करण्यात आली आहे. अधिक तपास सुरू आहे, अशी माहिती पेल्हार पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लब्दे यांनी दिली.

Hello Vasai
Page No. 4 Mar 14, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner